# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्सः२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक - आरएलएन-०७१५/सीआर-११/२०१५/तीन

**विषय**:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांमधील तथाकथित सामुहिक कॉपीच्या शक्यतेसंदर्भात वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द बातम्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांमध्ये मोबाईल क्रमांकाच्या आधारे दिल्या गेलेल्या बैठकव्यवस्थेमुळे सामुहिक कॉपीचा प्रयत्न होत असल्याबाबत मागील काही दिवसांमध्ये वृत्तपत्रांमधून/प्रसिध्द माध्यमाद्वारे बातम्या प्रसिध्द होत आहेत.

**२.** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांचे संवेदनशील स्वरुप, गांभीर्य व यासंदर्भात यापूर्वी निदर्शनास आलेले गैरप्रकाराचे प्रयत्न लक्षात घेऊन आयोगाकडून वेळोवेळी अनेक सुधारणात्मक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत/येत आहेत. गैरप्रकाराचे प्रयत्न रोखण्यासाठी करण्यात येणा-या विविध उपाययोजना या सतत चालणा-या सुधारणेचाच एक भाग आहे. एखादया जाहिरातीस अनुसरुन आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे प्राप्त होणा-या अर्जांची संख्या लक्षात घेऊन अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकानंतर उमेदवारांचे बैठक क्रमांक निर्माण (Generate) करताना सलगपणे अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचे बैठक क्रमांक एकापाठोपाठ एक येऊ नये, याद्दष्टीने प्रत्येक परीक्षेच्या वेळी स्वतंत्र कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येतो. तसेच, अशावेळी मागील काही परीक्षांच्या वेळी उपयोगात आणलेल्या कार्यपध्दतीचाही विचार करण्यात येतो. अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकानंतर सदर कार्यवाही केली जात असल्यामुळे त्यामध्ये पूर्व नियोजन असण्याचा संबंध येत नाही.

**३.** वरीलप्रमाणे बैठक क्रमांक निर्माण करण्याची कार्यपध्दत ही गैरप्रकाराचे प्रयत्न रोखण्यासाठी करण्यात येणा-या अनेक उपाययोजनेचा एक भाग आहे. परीक्षेच्या वेळी प्रत्येक उमेदवाराला पुरविण्यात आलेल्या प्रश्नपुस्तिकेला एक विशिष्ट संच क्रमांक असतो व तो सलग बैठक क्रमांक असलेल्या प्रत्येक उमेदवाराला वेगवेगळा असतो. तसेच उमेदवारांच्या आजुबाजुला असलेल्या अन्य रांगातील उमेदवारांच्या प्रश्नपुस्तिकेचा संच क्रमांकही वेगळा असतो. त्यामुळे बैठक क्रमांक सलग प्राप्त झाले तरी उमेदवाराला गैरप्रकाराची संधी राहत नाही.

**४.** प्रश्नपुस्तिकेच्या संच क्रमांकाच्या व्यवस्थेव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारे गैरप्रकाराचा प्रयत्न होऊ नये, या हेतुने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच दक्षता/विशेष निरीक्षकांच्या पथकाद्वारे कडक पर्यवेक्षण केले जात आहेत.

**५.** परीक्षेच्या वेळी कोणत्याही प्रकारे गैरप्रकाराचा प्रयत्न करणा-या अथवा आयोगाची फसवणूक करण्याच्या दृष्टीने खोटी माहिती/दिशाभूल करणारी माहिती सादर करणा-या उमेदवारासंदर्भात आयोगाची फसवणूक समजून अशा उमेदवारांची संबंधित परीक्षेची उमेदवारी रदद् होऊ शकते आणि /अथवा आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार संबंधित उमेदवाराला आयोगामार्फत आयोजित परीक्षा व निवडीकरीता कोणत्याही टप्प्यावर प्रतिरोधित (Debar) केले जाऊ शकते. याव्यतिरिक्त संबंधित कायदयातील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुध्दा आवश्यकतेनुसार करण्यात येईल.

मुंबई
दिनांक- १२ फेब्रुवारी, २०१९

उप सचिव/परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

TRIAL MODE - a valid license will remove this message. See the keywords property of this PDF for more information.